साप्ताहिक

# लोकजागर

पत्रकारितेत सन १९८० पासून

वसा लोकजागृतीचा...

संस्थापक - रविंद्र बेडकिहाळ.          संपादक - रोहित वाकडे.

RNI NO. - MAH / MAR / 1980 / 01823     Post Reg.No. - STR /019/ 2024 - 2026     email: weekly_lokjagar@rediffmail.com

। वर्ष ४६ वे । । अंक ०१ ला । **। दि. १७ मार्च २०२५ ते दि. २३ मार्च २०२५ ।** । पाने ४ । । किंमत २ रुपये । । पान क्र. १ ।

## ‘श्रीराम’ कारखान्यावर प्रशासक नेमून पारदर्शक निवडणूक व्हावी : रणजितसिंह नाईक निंबाळकर

। लोकजागर । फलटण ।

**‘‘श्रीराम सहकारी साखर कारखान्याची निवडणूक प्रशासक नेमून पारदर्शक पद्धतीने व्हावी ही सगळ्या सभासदांची इच्छा आहे. मयत सभासदांच्या वारसांना मतदानाचा हक्क मिळावा यासाठी आम्ही सुरु केलेली लढाई आता कोर्टात गेलेली आहे. ही कायदेशीर लढाई विश्वासराव भोसले व अ‍ॅड. नरसिंह निकम लढणार आहेत. त्यांना सर्वतोपरी सहकार्य आम्ही करणार आहोत’’, अशी भूमिका माढा लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी पत्रकार परिषदेद्वारे जाहीर केली.**



बहुचर्चित श्रीराम सहकारी साखर कारखान्याची संचालक मंडळ निवडणूक राज्य शासनाच्या सहकार विभागाकडून पुढे ढकलण्यात आल्याचा आदेश काल जारी झाला होता. त्याअनुषंगाने रणजितसिंह नाईक निंबाळकर बोलत होते. यावेळी आमदार सचिन पाटील, ज्येष्ठ नेते प्रल्हादराव साळुंखे - पाटील, फलटण तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष श्रीमंत शिवरुपराजे खर्डेकर, माजी सनदी (पान ३ वर...)

## कारखान्यावर प्रशासक नेमण्याचा ‘त्यांचा’ कुटील डाव : आ. श्रीमंत रामराजे

। लोकजागर । फलटण ।

**‘‘माजी खासदारांनी मुख्यमंत्र्यांकडे श्रीराम कारखान्यावर प्रशासक नेमण्याची मागणी केली होती. परंतु कालच्या सहकार विभागाच्या आदेशात प्रशासक नियुक्तीचा कुठेही उल्लेख नाही. शासनाने केवळ निवडणूक पुढे ढकलण्याचा निर्णय घेतलेला आहे. अशा प्रकारे प्रशासक नेमता येत नाही त्याबद्दल आम्हीही उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केलेली आहे. कारखान्यावर प्रशासक नेमण्यासाठी त्यांनी कुटील डाव खेळला आहे’’, असा आरोप आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी केला.**

श्रीराम सहकारी साखर कारखान्याच्या निवडणूकीच्या स्थगितीच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर बोलत होते. यावेळी युवा नेते श्रीमंत अनिकेतराजे नाईक निंबाळकर, कारखान्याचे चेअरमन डॉ. बाळासाहेब शेंडे, व्हाईस चेअरमन नितीन भोसले, संचालक संतोष खटके आदींची उपस्थिती होती.

‘‘प्रशासक नियुक्त झाला की काय अवस्था (पान ३ वर....)

## बाळशास्त्री जांभेकरांचे कार्य रविंद्र बेडकिहाळ यांनी परिश्रमातून पुढे आणले : डॉ. सदानंद मोरे



आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन करताना डॉ. सदानंद मोरे. सोबत रविंद्र बेडकिहाळ, प्राचार्य शांताराम आवटे, डॉ. सचिन सूर्यवंशी – बेडके, पोपटराव बर्गे, बाळासो भोसले, अमर शेंडे, महादेव गुंजवटे, भिवा जगताप, निलेश सोनवलकर, प्रा. विक्रम आपटे.

। लोकजागर । फलटण ।

**‘‘आचार्य बाळशास्त्री जांभेकर हे स्वातंत्र्यपूर्व काळातील महाराष्ट्राच्या समाजप्रबोधनातील अग्रदूत होते. राजा राममोहन रॉय यांनी स्त्री शिक्षण आणि स्त्रियांच्याबद्दलच्या हिंदू धर्मातील अनिष्ठ चालीरिती, रुढीपरंपरा या विरुद्ध उभारलेला लढा बाळशास्त्रींनी मुंबईत, महाराष्ट्रात अधिक ताकदीने पुढे नेला. शिक्षण, पत्रकारिता यासहीत अनेक क्षेत्रातील पुढाकार असलेले बाळशास्त्री जांभेकर जवळपास शे-सव्वाशे वर्षे विस्मृतीत गेले होते. परंतु रविंद्र बेडकिहाळ यांनी प्रदीर्घ परिश्रमातून बाळशास्त्री जांभेकर यांचे समग्र वाड्.मय तीन खंडातून महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या माध्यमातून पुढे आणले आहे. त्याचीही नोंद महाराष्ट्राला घ्यावी लागेल’’, असे गौरवोद्गार महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी काढले.**

डॉ. सदानंद मोरे यांनी महाराष्ट्र साहित्य परिषद परिषद फलटण शाखा व महात्मा एज्युकेशन सोसायटीच्या शैक्षणिक संकुलास सदिच्छा भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी म.सा.प. फलटण शाखा अध्यक्ष रविंद्र बेडकिहाळ, श्रीराम एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव डॉ. सचिन सूर्यवंशी - बेडके, महात्मा एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष प्राचार्य शांताराम आवटे, म.सा.प.शाखा कार्याध्यक्ष महादेव गुंजवटे, ज्येष्ठ सदस्य प्रा. विक्रम आपटे, शाखा कार्यवाह अमर शेंडे, इतिहास अभ्यासक पोपटराव बर्गे, श्रीराम विद्याभवन प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक मनिष निंबाळकर, आचार्य बाळशास्त्री जांभेकर माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक भिवा जगताप, पत्रकार विकास शिंदे, रोहित वाकडे, निलेश सोनवलकर, अभिषेक सरगर, आदींची उपस्थिती होती.

‘‘ब्रिटीश शासनात मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात रुजू होवून पहिले भारतीय प्रोफेसर होण्याचा मान बाळशास्त्री जांभेकरांनी मिळवला होता. देशातील राजकीय व्यवस्थेची पायाभरणी करणारे दादाभाई नौरोजी व सामाजिक सुधारणांची पायाभरणी करणारे दादोबा पांडुरंग हे बाळशास्त्रींचे शिष्य होते; यातून राजकीय आणि सामाजिक पायाभरणीतीलही जांभेकरांचे कार्य लक्षात येते. बाळशास्त्रींचे योगदान लक्षात घेता मुंबई विद्यापीठाला त्यांचे नाव देणे संयुक्तीक ठरु शकेल. तसा पाठपुरावा करावा’’, असेही डॉ. मोरे यांनी सूचित केले.

यावेळी रविंद्र बेडकिहाळ यांनी फलटण शहरातील म.सा.प.शाखेच्या साहित्यिक उपक्रमांविषयी सविस्तर माहिती दिली. डॉ. सचिन सूर्यवंशी - बेडके यांच्या हस्ते डॉ. सदानंद मोरे यांचे स्वागत करण्यात आले. महात्मा एज्युकेशन सोसायटी शिक्षण संकुलात डॉ. मोरे यांच्या हस्ते ‘दर्पण’कार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी जागतिक महिला दिनानिमित्त पारंपारिक वेशभूषेत आलेल्या श्रीराम विद्याभवनच्या चिमुकल्या विद्यार्थीनींचे कौतुक डॉ. सदानंद मोरे यांनी आवर्जून केले.



## शरद पवारांनी मानले पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार

। लोकजागर । नवी दिल्ली ।

**नवी दिल्ली येथे नुकत्याच पार पडलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून ‘अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना’च्या उद्घाटनाची विनंती मान्य केल्याबद्दल या संमेलनाचे स्वागताध्यक्ष, खा. शरद पवार यांनी आभार मानले आहेत.** खा. शरद पवार यांनी लिहिलेल्या पत्रात, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व लाभलेल्या नवी दिल्ली येथील तालकटोरा स्टेडियमवर पहिले बाजीराव पेशवे, महादजी शिंदे आणि सुभेदार मल्हारराव होळकर यांचे पूर्णाकृती अश्वारूढ पुतळे उभारले जावे अशी अनेकांची भावना आहे. तरी नवी दिल्ली महानगरपालिकेच्या अखत्यारीत येत असलेल्या तालकटोरा स्टेडियमवर हि शिल्पं स्थापित करण्यासाठी, आवश्यक परवानग्या देण्यासाठी, दिल्ली सरकार आणि एनडीएमसीला निर्देश देण्यासाठी पंतप्रधान महोदयांनी सहयोग करावा, अशी विनंती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केली आहे.



## जनतेने अधिक व्याजाच्या योजनांना बळी पडू नये

। लोकजागर । मुंबई ।

**राज्यातील जनतेने जास्त व्याज देणार्या योजनांच्या अमिषास बळी पडू नये, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेमध्ये केले.** सदस्य शशिकांत शिंदे यांनी टोरेस घोटाळा प्रकरणी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जादा व्याज देणार्या ९९ टक्के योजना या फसव्या असतात. कोणीही अशा प्रकारे जादा व्याज देऊ शकत नाही. बँकेच्या व्याजदरापेक्षा दोन ते चार टक्के जास्ती व्याज दिले जाणे शक्य आहे. पण त्यापेक्षा जास्त किंवा भरघोस व्याज देणे कोणालाही शक्य होत नाही. त्यामुळे असे जादा व्याजाचे अमिष देणार्या योजना फसव्याच असतात. त्यांच्या अमिषाला जनतेने बळी पडू नये आणि अशा फसव्या योजनांमध्ये गुंतवणूक करू नये, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. तसेच प्रश्नाला उत्तर देताना गृह राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की, राज्यातील गुंतवणूक तसेच अर्थिक व्यवहार करणार्या संस्थांवर देखरेखीसाठी इकॉनॉमिक इंटेलिजन्स युनिटची स्थापना करण्यात येत आहे. तसेच टोरेस प्रकरणी फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांचे पैसे परत करण्यासाठी कायदेशीर प्रक्रियेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

## फलटणला जिल्हास्तरीय दिवाणी न्यायालय मंजूर

। लोकजागर । फलटण ।

**माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या पाठपुराव्यानुसार फलटण जिल्हास्तरीय दिवाणी न्यायालय मंजूर झाले आहे. याबाबतच्या कार्यवाहीचा आदेश निर्गमित झाल्यामुळे फलटणकरांना मोठा दिलासा मिळाला आहे.** फलटण वकील संघाच्या वतीने माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचे विशेष आभार मानण्यात आले आहेत.

# 'लोकजागर' वर्धापन दिनाच्या निमित्ताने...

। लोकजागर ।

**वर्तमानपत्राबाबतच्या आजच्या आर्थिक गणितांचा विचार केला तर एखादे वृत्तपत्र चालविणे म्हणजे पांढरा हत्ती पोसण्यासारखे आहे. भांडवलशाही वृत्तपत्रे व इलेक्ट्रॉनिक मिडीयासमोर छोट्या वृत्तपत्रांना नगण्य किंमत दिली जात आहे. वृत्तपत्राला 'कर्मशिअल' पद्धतीने चालविले तरच ते सुरु राहू शकते; मात्र यामध्ये पत्रकारितेची मूल्ये जपली जातील याची शाश्वती अजिबात नाही. अशा भीषण परिस्थितीतही पदरमोड करुन, नफा - तोट्याकडे कानाडोळा करुन, लोकजागृतीचा वसा घेवून १७ मार्च १९८० रोजी सुरु झालेले 'साप्ताहिक लोकजागर' हे वृत्तपत्र संस्थापक रविंद्र बेडकिहाळ यांच्या नेतृत्त्वाखाली ४५ वर्षे अव्याहतपणे सुरु आहे. श्री.बेडकिहाळ सरांनी जर मनात आणले असते तर त्यांच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मंडळींच्या मदतीवर आपले हे वृत्तपत्र सहजरित्या आर्थिकदृष्ट्या सक्षम करुन त्यातून भरघोस उत्पन्नाचे साधन निर्माण केले असते. मात्र पत्रकारितेतील मूल्यांची जोपासना करुन आपले वृत्तपत्र लहान तर लहान पण ते कोणाच्याही ताटाखालचे मांजर होऊन द्यायचे नाही ही रोखठोक भूमिका त्यांनी 'लोकजागर'च्या बाबतीत ठेवली. पत्रकारिता व वृत्तपत्रसृष्टीप्रती असणारी त्यांची निष्ठा यामध्ये प्रकर्षाने दिसून येते.**



**रोहित वाकडे,**
संपादक, सा.लोकजागर

मराठी पत्रकारितेला स्वातंत्र्यपूर्व काळापासून मोठा इतिहास आहे. समाजाला दिशा देण्याचे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे, सकारात्मक गोष्टींना लोकांसमोर आणण्याचे आणि अपप्रवृत्तींना ठेचण्याचे काम आजवर असंख्य पत्रकारांनी केलेले आहे. आज पत्रकारिता क्षेत्रात विविध माध्यमांचा प्रभाव आहे. मात्र या सर्व माध्यमांचा मूळ पाया असणारी वृत्तपत्रसृष्टी सर्वार्थाने आजही प्रभावी आहे. या आपल्या मराठी वृत्तपत्रसृष्टीची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' या पहिल्या मराठी वृत्तपत्राची सुरुवात केली आणि त्यानंतर अनेक दिग्गजांनी ही परंपरा उज्वल केली. अगोदरच पारतंत्र्यात असलेला देश आणि त्यात अनिष्ट धार्मिक रुढी, परंपरा, चालिरीतींचा जनमानसावर मोठा प्रभाव या प्रतिकूल परिस्थितीविरोधात समाजजागृतीचे काम वर्तमानपत्राच्या माध्यमातून करण्याचे काम बाळशास्त्रींनी केले. बाळशास्त्रींचा हा प्रयोग इतका प्रभावी ठरला की पुढे जावून भारतीय स्वातंत्र्य लढ्यात ब्रिटीश राजवटीविरोधात लढताना एका विशिष्ठ समाजोपयोगी ध्येयवादाने पत्रकारितेची फार मोठी चळवळ सुरु झाली. किंबहुना ही चळवळ केवळ स्वातंत्र्यप्राप्ती पर्यंतच मर्यादित राहिली नाही तर त्यानंतरही नवभारताला दिशा देण्याचे काम या माध्यमातून झाले. अशा या मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक असणाऱ्या आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे स्मरणकार्य हाच ध्यास घेवून जगणाऱ्या श्री. बेडकिहाळ सरांनी सुरु केलेले 'लोकजागर' हे वृत्तपत्र पत्रकारितेची नितीमुल्ये जपत त्यांच्या मार्गदर्शनात नियमीतपणे साप्ताहिक स्वरुपात प्रसिद्ध होवून पन्नाशीच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

'लोकजागर'चे आणखी एक वैशिष्ठ्य म्हणजे; दरवर्षी प्रसिद्ध होणारा आकर्षक दिवाळी विशेषांक. ग्रामीण भागातील कवि व साहित्यिकांना प्रोत्साहन म्हणून फलटणमधून गेली ४५ वर्षे लोकजागरच्या दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन श्री.बेडकिहाळ सरांच्या जिद्दीमुळेच होत आहे. कागद व छपाईचा वाढलेला खर्च, जाहिरातींचा कमी झालेला ओघ, वाचन संस्कृतीचा होत चाललेला लोप, डिजीटल माध्यमांचा वाढता प्रभाव या सगळ्या समस्या दिवाळी अंकांसारख्या पारंपारिक साहित्यकृतींना भेडसावत असताना देखील 'परंपरा खंडीत होता कामा नये; मग तुम्ही काहीही करा' असे श्री.बेडकिहाळ सरांनी सांगितल्यानंतर छोटेखानी का होईना पण दिवाळी अंक आम्ही जिद्दीने प्रकाशित करीतच असतो. वृत्तपत्र व्यवसायात नियमितता, सातत्य याला नेहमी महत्त्व द्यावे; हेच श्री.बेडकिहाळ सरांच्या भूमिकेतून लक्षात आले.

समाजातील दुर्दम्य परिस्थिती नेमकेपणाने हेरुन त्यावर लिखाण करण्याची सरांच्या अंगी असलेली संपादकाची हातोटी आम्हाला 'लोकजागर'चे काम करताना बरेच काही शिकवून जाते. यानिमित्ताने 'लोकजागर'च्या माध्यमातून वृत्तपत्र क्षेत्रात आज काम करत असताना सरांकडून सातत्याने मिळणारे 'धडे' माझ्यासाठी अनमोल असेच आहेत.

**शेवटचा मुद्दा :**

आज 'लोकजागर' ४५ वर्षांचा प्रवास पूर्ण करुन ४६ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. माध्यम क्षेत्रातील अमूलाग्र बदल आणि सोशल मिडीयाचा अतिरेक यामध्ये वृत्तपत्रे केवळ आणि केवळ 'विश्वासार्हता' यावरच टिकून राहणार आहेत. त्यामुळे गेल्या ४५ वर्षांच्या वाटचालीप्रमाणे पुढेही लोकजागृतीचा वसा अखंड सुरु ठेवताना 'विश्वासार्हता' हे मूल्य जपून 'लोकजागर' कार्यरत ठेवणे हे मोठे आव्हान राहणार आहे. त्यानुसार 'लोकजागर' ने डिजीटल माध्यम क्षेत्रातही प्रवेश केला असून 'लोकजागर डॉट इन' हे न्यूज पोर्टल नव्याने आम्ही सुरु केलेले आहे. येत्या काळात 'लोकजागर' चा यु – ट्यूब चॅनेलही आम्ही सुरु करणार आहोत. बातम्यांच्या घाईगडबडीत सदोष बातम्या न देता वाचकांना परिपूर्ण आणि अचूक बातम्या, लेख, मुलाखती उपलब्ध करुन देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. अर्थातच हे सर्व करत असताना व्यवसायाभिमुख धोरणही स्विकारावे लागणार आहे. त्यामुळे या सगळ्या वाटचालीत नियमित वाचक, वर्गणीदार, जाहिरातदार, हितचिंतक यांच्या सहकार्याची अपेक्षा आहे.

■■■

## कृषिभान...

# हक्कसोड

। लोकजागर ।

**अलिकडच्या 'विकासाच्या' काळात शेतकऱ्यांसमोर एक नवेच संकट उभे राहिले आहे. अगोदरही हे संकट होतेच पण हल्ली त्याचे स्वरूप जरासे तीव्र भासू लागले आहे. जमिनीला किरकोळ भाव असेल तर त्या संकटाची शक्यता नसल्यात जमा अशी असते, आणि शेती जर एखाद्या सरकारी प्रकल्पात जात असेल तर येणाऱ्या मोबदल्याच्या रकमेने हे संकट भयानक तीव्र होत असल्यामुळे अशा विकासकामांना विरोध करण्यापर्यंत शेतकऱ्यांची मानसिकता तयार झाली आहे, ते संकट म्हणजे हक्कसोड.**



सर्व प्राणी सारखे आहेत, समान आहेत. हे सर्वांना मान्य होणारे सत्य आहे तरीही आपण एखाद्या प्राण्याच्या समान आहोत असे मानवप्राण्याला वाटत नाही, इतर सर्व प्राण्यांपेक्षा आपण श्रेष्ठ आहोत असा मानवाचा भ्रम जसा कायम असतो अगदी तसेच स्त्री व पुरुष केवळ लिंगभावाने वेगळे आहेत, अन्यथा ते समान आहेत, मानवच आहेत, असे असताना पुरुष हा स्त्रीपेक्षा श्रेष्ठ असे गृहीतक आपल्या जनमानसात खोल रुजले आहे. त्या अनुषंगाने आपली संस्कृती बनत गेली असल्याने आपल्याला अशी गृहितकं सोडताना त्रास होत असतो, किंवा एखादी नवीच समस्या त्या बदल्यात निर्माण होत असते.

पारंपारिक कायद्याच्या राज्यात स्त्रीला अव्याहत दुय्यमत्त्व दिले गेले होते, मात्र नव्या कायद्याच्या राज्याने स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीचा वारसा हक्क दिला आहे. आपली सामाजिक, सांस्कृतिक जडणघडण आणि मानसिकता मात्र आपली जुनी संस्कृती परंपरा सोडण्याच्या आड येत असते, आणि ते साहजिक आहे. आपल्या लग्नाच्या चालीरीती जुन्याच आहेत, त्यात आपल्याला सुरक्षित वाटत असल्यामुळे त्या रूढी आणि परंपरा पाळण्याकडे समाजातील बहुसंख्य लोकांचा कल असणे स्वाभाविक आहे.

शेतकरी आपली मुलगी देताना समोरचे घर आपल्या तोलामोलाचे आहे का याची आधी खात्री करत असत, बऱ्याचदा 'साटेलोटे' करायची पद्धत होती, म्हणजे आपली मुलगी देवून त्याबदल्यात त्या घरातील मुलगी आपल्याकडे सून म्हणून आणली जायची. त्यामुळे बऱ्याच गोष्टींचा समतोल सांभाळला जायचा. आता असा समतोल साधणे दूर शेतकऱ्यांना मुलगी मिळणे कठीण झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मुली इतर व्यवसाय, नोकरी करत असलेल्या संपन्न घरी दिल्या जातात. त्यांची संपन्नता वाढवण्याच्या पद्धती शेतीसंस्कृती पेक्षा भिन्न असतात, अवाजवी स्वार्थावर आधारित असतात, त्यामुळे जर एखाद्या शेतकऱ्याची जमीन सरकारी प्रकल्पात अवाच्या सव्वा किमतीला जात असेल तर

**लेखांक ४३**

ते संपन्न घरवाले व्याही शेतकऱ्याच्या मुलीला त्या मोबदल्याच्या रकमेत आपला वाटा मागायला भाग पाडतात. एखाद्या गरीब घरी दिलेली किंवा 'गेलेली' मुलगीही तो हक्क मागेलच, पण जर तोलामोलाच्या आणि नातेसंबंधांत पत पाळून असलेल्या घरात मुलगी दिली असेल तर ते घर असा हक्क मागायला हजारवेळा विचार करतील, अशी आपली ग्रामीण आणि शेतीप्रधान संस्कृती आहे.

शेतकऱ्याने आपली मुलगी खात्या-पित्या घरी देण्यासाठी आधीच अवाजवी खर्च केलेला असतो, शेतीचे आधीचेच अस्मानी-सुलतानी संकट त्याला छळत असते, त्यात ह्या नव्या संकटाची चिंता प्रत्येक शेतकऱ्याला विशेषतः शेतकऱ्याच्या प्रत्येक पोराला सतावित असते. शेतीतील आपला वारसाहक्क सोडण्यासाठी दागदागिने किंवा काही रक्कम मागण्याची प्रथा गेल्या काही दशकांत रूढ झाली आहे. एखाद्या मुलीने पालकांच्या मनाविरुद्ध लग्न केले तर आधी तिच्याकडून 'हक्क मागणार नाही' याची नोटरी करून घेऊन नंतर तिच्याशी नातेसंबंध तोडले जातात, त्यामागे शेतीची समस्या, संस्कृती, परंपरा आणि बरीच कारणे आहेत.

गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात हमरस्त्यांच्या कामांनी वेग घेतला आहे. चौपदरी- सहा पदरी नवे रस्ते तयार होऊ लागले आहेत. एकदोन वाफेच नाही तर अख्खे शेतच त्या रस्त्याच्या कामात सरकार खरेदी करू लागले आहे, अशावेळी 'सात-बारा' वर जेवढे वारस नोंद असतील त्यांच्या संमतीची गरज भासू लागली तसेच त्या-त्या वारसाच्या खात्यावर थेट रक्कम ऑनलाईन पद्धतीने जमा होऊ लागली आहे. मुंबई- नागपूर समृद्धी महामार्गाच्या वेळी बऱ्याच शेतकऱ्यांना हा अनुभव आला आहे, शेतही गेले आणि त्याचा मोबदलाही हातात कमी पडला म्हणून आता सावध झालेले काही शेतकरी नागपूर-कोल्हापूर ह्या शक्तीपीठ महामार्गाला विरोध करू लागले आहेत. विरोधाचे कारण कायद्याच्या चौकटीत बसणारे नाही, ते कारण रूढी-परंपरेच्या चाकोरीतील आहे, त्यामुळे त्यावर उघडउघड चर्चा होणं शक्य नाही. पण त्यावर बोलणं गरजेचं आहे कारण आज ते शेतकरी जात्यात आहेत तर इतर शेतकरी सुपात आहेत.

शेतकऱ्याच्या समस्यांना अंत नाही, एकतर तो असंघटीत आहे, त्याला कित्येक वर्ष त्यानेच निवडून दिलेले नेतृत्व गंडवत आले आहे, आपल्या प्रश्नांकडे व्यापक दृष्टीकोनातून पाहून मार्ग काढेल असा विचारवंतांचा वर्ग शेतकऱ्याकडे नाही, तसा वर्ग तर आज इतर कुणाकडेच नाही!

■■■

**गोपाळ सरक**

# कुंभमेळा....



## कविता...

सुप्रभातीचे रंग न्याहाळत
निघालो भटकंतीला
डोंगररांगा, हिरवी शेते
सुखावती मम हृदयाला

आबापुरीच्या श्रीगणेश
दगडी शिळांचे मंदिर
सप्तमातांचे घडले दर्शन
करते प्रथम तुज वंदन

तुळजाभवानी यमाईस
घालते मनापासून साद
सिद्धनाथ भैरवनाथाचा
गाभारी घुमतो सिंहनाद

ब्रह्मपुरीची आश्रम शाळा
लाविते बालकां लळा
गाडगे बाबांचा स्वच्छतामंत्र
झाला अनाथांचा तारकमंत्र

चौंडेश्वरीची कृपा सारस्वतांवर
ग्रामी घडले ते कानेटकर
रहिमतपुरी फुलले वसंत स्मारक
रायगडीचं नाटक झाले अजरामर

यशस्वी तपपूर्ती सहवासची
शोधित समाजसेवेच्या वाटा
उजळत शोषितांच्या जीवना
येऊ दे वसंताच्या लाटा

नाविन्यपूर्ण हा कुंभमेळा
सख्यांनी साजरा केला सोहळा
पापपुण्याची केली नाही गणती
सहवासची दिगंतात वाढो कीर्ती ..

■■■

**रंजना डफळे, सातारा.**

लोकजागर NEWS

डिजीटल बातम्यांसाठी lokjagar.in ला भेट द्या !

बातम्या मोबाईलवर वाचण्यासाठी ९८५०४४४१६३ या क्रमांकावर मेसेज करा. तसेच तुमच्या व्हॉटस्‌ॲप ग्रुपला हा नंबर ॲड करा.

सा. लोकजागर हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक सौ.अलका रविंद्र बेडकिहाळ यांनी ज्योर्तिलिंग प्रिंटींग प्रेस, शारदानगर, कोळकी, ता. फलटण ४१५ ५२३ जि. सातारा,महाराष्ट्र राज्य (भारत) येथे छापून ३२२, कसबा पेठ, फलटण ४१५ ५२३ जि. सातारा,महाराष्ट्र राज्य (भारत)येथे प्रकाशित केले. लेखात, निवेदनात, पत्रव्यवहारात व्यक्त मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबी उद्भवल्यास फलटण कोर्टात. अन्यत्र कोठेही नाही. संपादक : रोहित राजेंद्र वाकडे.
वार्षिक वर्गणी - रु. २०० फक्त ........ फोन नं. कार्यालय - (०२१६६) २२१११३, निवास - २२२३२१ ✻ कार्यकारी संपादक - सौ. शैलजा बेडकिहाळ ✻ व्यवस्थापकीय संपादक - सौ.अलका बेडकिहाळ ✻ सातारा प्रतिनिधी - श्री. गोविंद बेडकिहाळ सातारा कार्यालय - बिल्वदल, ७६ क, शुक्रवार पेठ, सातारा, फोन नं. २८२००७. ✻ पुणे कार्यालय - श्रीराम बेडकिहाळ, मौर्य विहार, बिल्डिंग नं. एफ १२, तुळजानंद सोसायटी, कोथरुड, पुणे - ३८. फोन. : (०२०) २५३८६२४५ E-mail Address -weekly_lokjagar@rediff.com

# ‘श्रीराम’ कारखान्यावर प्रशासक नेमून पारदर्शक निवडणूक व्हावी : रणजितसिंह नाईक निंबाळकर

(...पान १ वरुन)

अधिकारी विश्वासराव भोसले, ॲड. नरसिंह निकम आदींसह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

रणजितसिंह नाईक निंबाळकर पुढे म्हणाले, “ जवळपास तीन हजार मयत सभासदांच्या वारसाहक्कासाठी निर्णायक भूमिका घेवून लढलं पाहिजे अशी भूमिका आम्ही घेतली होती. विश्वासराव भोसले यांनी सुरुवातीला जिल्हा निवडणूक निर्णय अधिकार्यांकडे तथा सहसंचालक यांच्याकडे लढाई केली. त्यात काही अंशी यश आले तर काही अंशी अपयश आले. ही निवडणूक पारदर्शी



पद्धतीने व्हावी यासाठी आपली भूमिका राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार व सहकार मंत्री यांना त्यांनी पटवून दिली. त्यातून राज्यसरकारने ही निवडणूक पुढे ढकलली आहे”, असेही रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी स्पष्ट केले.

“श्रीराम सहकारी कारखान्याने नियमांचे उल्लघन करुन मयत सभासदांच्या वारसांना सभासदत्व दिले नाही. या प्रारुप सभासद यादीवर आम्ही हरकत दाखल केली. त्यावर सुनावणीमध्ये या मयत सभासदांची नावे कमी करण्याचा आदेश निवडणूक अधिकार्यांनी दिला. त्यामुळे या विरोधात उच्च न्यायालयात दाद मागितली आहे. संस्थापक सभासदांना नियमानुसार कारखान्याने शेअर्स ट्रान्सफरबाबत सुचना द्यायला पाहिजे होती. तसे न करता बोगस सभासद वाढवण्यात आलेले आहेत. त्यामुळे संस्थापक सभासदांच्या वारसांना सभासदत्व मिळवून मतदानाचा अधिकार मिळावा ही भूमिका आपल्या याचिकेमध्ये आहे”, असे विश्वासराव भोसले यांनी स्पष्ट केले.

# कारखान्यावर प्रशासक नेमण्याचा ‘त्यांचा’ कुटील डाव : आ. श्रीमंत रामराजे

(.... पान १ वरुन)

होते हे आपण नगरपालिकेत आज बघत आहोत. तेथील प्रशासक त्यांच्या मागे फिरुन त्यांनी सांगितलेली कायदेशीर - बेकायदेशीर कामे करत असतात. हीच परिस्थिती त्यांना श्रीराम कारखान्यात अप्रत्यक्षरित्या चुकीचे निर्णय घेवून आणायची आहे. पण त्यांचे हे कारस्थान आपण यशस्वी होऊ देणार नाही. प्रशासकीय दहशत कशी असते ? याचं उदाहरण हा फलटण तालुका आहे”, असेही आ. श्रीमंत रामराजे यांनी यावेळी स्पष्ट केले.

“या कारखान्याला उर्जितावस्था येत असताना गेली १५ वर्षे विश्वासराव भोसले कुठे होते?,” असा सवाल करुन “इतर नेत्यांची नावे घेऊन तुम्ही कशाला निवडणूकीला सामोरे जाता. एकदा तरी स्वत:च्या ताकदीवर निवडणूक लढा. आम्ही निवडणूकीसाठी सज्ज आहोत”, असे आव्हानही आ. श्रीमंत रामराजे यांनी यावेळी दिले.

श्रीराम कारखान्याचे चेअरमन डॉ. बाळासाहेब शेंडे यांनी विश्वासराव भोसले यांनी तक्रारीत नमूद केलेल्या चार मुद्यांना सविस्तर उत्तरे दिली. यावेळी बोलताना डॉ. शेंडे म्हणाले की, “आम्ही कारखान्याच्या एकूण १६,७३९ सभासदांची यादी



निवडणूक अधिकार्यांकडे दिलेली होती. त्यांनतर मयत सभासदांबाबत हरकत घेण्यात आल्यानंतर २,१२४ सभासदांची नावे करुन १४,६१५ सभासदांची यादी आम्ही सादर केली. ती यादी त्यांनी मान्य केली आहे. सन २००२ पासून ते आजपर्यंत जवळ २,००० हजार मयत सभासदांची वारस नोंद आम्ही केलेली आहे. प्रत्येक वार्षिक सभेत आम्ही वारसनोंदीबाबत आवाहन केले होते.”

“सभासदाचे कमीत कमी २० गुंठे क्षेत्र असावे तेव्हा तो सभासद होऊ शकतो, असा आक्षेप त्यांनी घेतला आहे. सन २००२ पासून आम्ही केलेले सभासद त्यांचे ७/१२ घेवून केलेले आहेत. या नियमाची कुठेही आम्ही पायमल्ली केलेली नाही. सभासदत्व मिळाल्यानंतर काहींचे क्षेत्र वारसांकडे गेले असेल किंवा काहींनी आपले क्षेत्र विकले असल्याची काही उदाहरणे असू शकतील. मात्र सभासदत्व देताना आपण ७/१२ ची खात्री केलेली आहे”, असेही डॉ. शेंडे यांनी स्पष्ट केले.

“सभासदत्वासाठी १५ हजार रुपयांचा शेअर्स भरण्याचा नियम झाल्यानंतर ज्यांची शेअर्सची रक्कम कमी आहे ती भरुन घेण्याचा आम्ही प्रयत्न केला होता. परंतु प्रत्येकाला ही रक्कम भरणे शक्य नव्हते. तेव्हा सभासदाच्या ऊसाच्या पेमेंटमधून ही रक्कम पूर्ण करुन घेण्याचा निर्णय घेतला गेला. मात्र सभासदांनी त्याला विरोध करुन टप्प्याटप्प्याने थोडी थोडी रक्कम वजा करुन शेअर्सची रक्कम पूर्ण करण्याचा निर्णय झाला. त्यानुसार दिनांक १/१/२०२३ पर्यंत ७९ सभासदांचे १५ हजार शेअर्स पूर्ण आहेत”, असेही डॉ. शेंडे यांनी सांगितले.

“पाच वर्षातून एकदा तरी ऊस घातला पाहिजे. बरेच लोक श्रीराम कडे नोंद करतात पण आपला ऊस लवकरात लवकर जावा या उद्देशाने अन्यत्र ऊस घातला जातो. पण जास्तीत जास्त सभासदांनी श्रीरामला ऊस घातलेला आहे”, असे स्पष्ट करुन “त्यांच्या हरकतीप्रमाणे आम्ही गेलो असतो तर फक्त ७९ सभासदांची यादी आम्ही दिली असती. मात्र मतदानास पात्र असणार्या सभासदांचीच यादी आम्ही निवडणूक निर्णय अधिकार्यांकडे दिलेली आहे. ती त्यांनी मंजूरही केलेली आहे. त्यामुळे आम्ही फक्त ७९ लोकांचीच यादी पाठवली आहे आणि तेव्हढेच मतदान करणार असा गैरसमज कुणीही करु नये. शासनाच्या कालच्या आदेशातही निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे असे नमूद केले आहे. या आदेशात प्रशासक नियुक्तीचा कुठलाही उल्लेख नाही”, असेही डॉ. शेंडे यांनी स्पष्ट केले. यावेळी डॉ. बाळासाहेब शेंडे यांनी कारखाना उभारणीपासूनचा इतिहास सविस्तर विषद केला.



# ‘गुर्ज’ पाहून बर्गे घराण्याची शक्ती आणि युक्ती लक्षात येते : अभिनेते शंतनु मोघे


। लोकजागर । फलटण ।

**क्षत्रिय मराठा बर्गे घराण्याचे ऐतिहासिक शस्त्र ‘गुर्ज’ पाहून हे घराणे हिंदवी स्वराज्यासाठी किती शक्ती आणि युक्तीने झुंजले असेल याची कल्पना येते, असे उद्गार प्रसिद्ध अभिनेते शंतनु मोघे यांनी काढले.**

पुणे येथील बालगंधर्व कलादालनात सह्याद्री प्रतिष्ठान, हिंदुस्थान यांच्यावतीने ‘मराठ्यांचे शस्त्रागार’ हे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार व प्रसिद्ध अभिनेते शंतनु मोघे यांच्या हस्ते पार पडले. त्यानंतर प्रदर्शनाची पाहणी करताना बर्गे घराण्याच्या शस्त्रांची माहिती फलटण येथील इतिहास अभ्यासक पोपटराव बर्गे यांनी शंतनु मोघे यांना दिली. त्यावेळी ते बोलत होते. शंतनु मोघे पुढे म्हणाले, “ या प्रदर्शनातील क्षत्रिय मराठा बर्गे घराण्याचे ऐतिहासिक शस्त्र गुर्ज हे शस्त्र शत्रूच्या अंगावरील लोखंडी चिलखत सहजपणे तोडू शकते. हे गुर्ज शस्त्र व क्षत्रिय मराठा बर्गे घराण्याचे पूर्वज हिंदस्वी स्वराज्यासाठी किती शक्ती, युक्तीने झुंजले असतील हे शस्त्र पाहून कळते. आपण हे ऐतिहासिक शस्त्र गुर्ज पाहून धन्य झालो. अशी अनेक प्रकारची गोल गुर्ज पाहिली आहेत. प्रदर्शनातील हे शस्त्र महत्त्वपूर्ण ऐतिहासिक ठेवा आहे.”

या शस्त्र प्रदर्शनात छत्रपती शिवाजी महाराजांच्या सोबत स्वराज्य निर्मितीच्या कार्यात लढणारे सरसेनापती, सरलष्कर, सुभेदार तसेच प्रमुख सरदारांच्या देव्हार्यातील शस्त्रे पाहण्यासाठी ठेवण्यात आली होती. यामध्ये श्रीमंत पवार, कंक, बर्गे, गरुड, शिरोळे, विंचूरकर, बावडेकर, पोतनीस, वरखडे, मोहिते, साबुसिंग पवार, खाडे, गोळे, इब्राहिम गारदी, जाधवराव, माने, बाबर, गाडे, बांदल, राजेशिर्के, डिंबळे, शितोळे, बारगर, गंधे आदी घराण्यांचा समावेश होता.

# बाळासाहेब वेलणकर यांचे दु:खद निधन



। लोकजागर । फलटण ।

**शहरातील शंकर मार्केट परिसरातील भैरोबा गल्ली येथील रहिवासी, जुन्या काळातील इलेक्ट्रीकल काँन्ट्रॅक्टर सूर्यकांत उर्फ बाळासाहेब वेलणकर (वय ८७) यांचे वृद्धापकाळाने राहत्या घरी निधन झाले.**

सातारा जिल्ह्यातील जुन्या काळातील सर्वात पहिले इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर म्हणून ते सर्वत्र सुपरिचित होते.

त्यांच्या पश्चात अनिल व अतुल ही दोन मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# सुलेखा शिंदे यांचा समाजसेविका ते कादंबरीकार हा प्रवास संघर्षमय होता : रविंद्र बेडकिहाळ

। लोकजागर । फलटण ।

**“सुलेखाताईंचं लिहणं आणि जाणं दोन्ही मनाला चटका लावणारं होत. त्यांनी लिहिलेले साहित्य अनुभव विश्वावर आधारीत होते. एक समाजसेविका ते कादंबरीकार हा त्यांचा प्रवास संघर्षमय होता. लेखकाचं घर पेलणारी ही आई साखरशाळेतील ऊसतोडणी मजुरांच्या मुलांची ही आई होती. घरच्या परिस्थितीमध्ये पोटातील भूक पोटातच ठेऊन लेखणीतून नवे साहित्य जन्माला घालणार्या सुलेखाताईंचा हा प्रवास म्हणजे आयुष्यभर सोसलेल्या कष्टाची गाथाच आहे”, असे विचार महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सातारा जिल्हा प्रतिनिधी तथा ज्येष्ठ पत्रकार रविंद्र बेडकिहाळ यांनी व्यक्त केले.**



**‘सुलेखा शिंदे : समाजसेविका ते कादंबरीकार’ पुस्तक प्रकाशनाप्रसंगी रविंद्र बेडकिहाळ, प्रा. रमेश आढाव, सुरेश शिंदे, ताराचंद्र आवळे, महादेव गुंजवटे आदी.**

येथील प्रसिद्ध लेखक ‘सर्ज्या’कार सुरेश शिंदे यांच्या पत्नी तथा पत्रकार विकास शिंदे यांच्या मातोश्री, लेखिका कै. सुलेखा शिंदे यांच्या प्रथम पुण्यस्मरणदिनी पुस्तक प्रकाशन, पुरस्कार वितरण, किर्तन अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन बुधवार, दिनांक १२ मार्च २०२५ रोजी करण्यात आले होते. हे सर्व कार्यक्रम तांबमाळ (फलटण) येथील सुर्याजी गार्डन बँक्केट हॉल येथे पार पडले. त्यावेळी ‘सुलेखा सुरेश शिंदे - समाजसेविका ते कादंबरीकार’ या पुस्तक प्रकाशनावेळी बेडकिहाळ बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा फलटणचे कार्याध्यक्ष महादेव गुंजवटे, साहित्यिक सुरेश शिंदे, ज्येष्ठ पत्रकार प्रा. रमेश आढाव, प्राचार्य शांताराम आवटे, माणदेशी साहित्यिक ताराचंद्र आवळे, बाळासाहेब ननावरे, बापूराव शिंदे, गोविंद भुजबळ, राजेंद्र बोराटे, सौ. अलका बेडकिहाळ, सुरेखा फुले, शशिकला नवले, रोहित वाकडे, राजेंद्र बोन्द्रे, जयवंत फुले, दादासाहेब कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

नेहमी साहित्यिकांना पुरस्कार दिले जातात मात्र या कार्यक्रमावेळी ‘सुलेखा सुरेश शिंदे साहित्य संवाद पुरस्कार’ खास वाचकांसाठी देण्यात आला. या आगळ्यावेगळ्या पुरस्काराचे मानकरी दिलीप जनार्दन पिसाळ व नसीम कादर पठाण यांना मान्यवरांचे हस्ते मानपत्र, शाल, पुस्तके व श्रीफळ देऊन मान्यवरांचे गौरविण्यात आले. नासिमा पठाण यांनी पुरस्काराबद्दल कृतज्ञतपर आपले मनोगत व्यक्त केले.

तत्पूर्वी युवा कीर्तनकार ह.भ.प. नवनाथ महाराज कोलवडकर यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. त्यांनी आपल्या कीर्तनसेवेत सुलेखा शिंदे यांच्या साहित्यसेवेचा आढावा घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माणदेशी साहित्यिक ताराचंद्र आवळे यांनी केले तर आभार विकास शिंदे यांनी मानले. यावेळी साहित्य, सामाजिक, शैक्षणिक, वृत्तपत्र, सहकार, राजकीय, कृषी अशा विविध क्षेत्रातील मान्यवर व रसिक उपस्थित होते.

लोकजागर

## फलटण नगरपालिकेकडून थकबाकीदारांवर कारवाई सुरु

। लोकजागर । फलटण ।

**सन २०२४ - २०२५ या आर्थिक वर्षअखेरीच्या पार्श्वभूमीवर फलटण नगरपालिकेकडून शहरातील थकबाकीदार मिळकत धारकांविरोधात कारवाई सुरु करण्यात आली असून या वसुलीकामी फलटणकरांनी नगरसालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी निखील मोरे यांनी केले आहे.**

थकीत मालमत्ता कर व पाणीपट्टीची तसेच गाळाभाडेची रक्कम त्वरीत भरणा करावी व जप्ती करणे, नळ कनेक्शन बंद करणे, गाळा सिल करणे या कटू बाबी टाळून नगर परिषदेस वसुलीकामी सहकार्य करावे, असे आवाहन फलटण पालिकेमार्फत करण्यात आले आहे.

## सौ.प्रियांका आंबेकर फलटणच्या नूतन प्रांताधिकारी

। लोकजागर । फलटण ।



**फलटण उपविभागीय अधिकारी अर्थात प्रांताधिकारी पदावर नियुक्त झालेल्या सौ. प्रियांका आंबेकर यांनी फलटण उपविभागाचा पदभार स्वीकारला आहे. यावेळी फलटण उपविभागीय अधिकारी, फलटण तहसील कार्यालय येथील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

प्रारंभी सौ. प्रियांका आंबेकर यांचे शासकीय विश्रामगृह फलटण येथे निवासी नायब तहसीलदार अभिजीत सोनवणे यांनी स्वागत केले. यावेळी फलटण प्रांत कार्यालय नायब तसीलदार तुषार देशमुख, नायब तहसीलदार महसूल तुषार गुंजवटे, फलटण तालुका तलाठी संघटना अध्यक्ष लक्ष्मण अहिवळे, मंडल अधिकारी शिलवंत चव्हाण हे उपस्थित होते.

**सा.बां.विभाग शासन निर्णय शुद्धीपत्रक क्र.सीएटी /01/२०१५/प्र.क्र.२०/इमा-२, दिनांक २९ जुलै २०२१**
**निविदा सूचना महाराष्ट्र शासन,**
**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा**
**रेणूका पेट्रोल पंपाजवळ, पोवईनाका, सातारा ४१५ 00१**

ई-मेल पत्ता - satara.ee@mahapwd.com    दुरध्वनी/फॅक्स क्रमांक : (०२१६२) २३३७९२

## निविदा सुचना क्र.१० सन २०२४ - २०२५

खालील कामांच्या सिलबंद निविदा बी - १ नमुना कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा **दुरध्वनी क्र. ०२१६२ - २३३७९२** हे महाराष्ट्र शासन सा. बां. खातेकडील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागवित आहेत. खालील कामांच्या निविदा या **दि. १७/०३/२०२५ रोजी सकाळी १०.०० ते दि. २४/०३/२०२५ रोजी सायंकाळी १७.३०** पर्यंत www.mahapwd.gov.in वेबसाईटवर मिळतील. कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, सातारा हे सिलबंद निविदा **दि. २४/०३/२०२५ रोजी सायंकाळी १७.४५ वाजेपर्यंत** स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. **कामांच्या अंदाजपत्रकीय दरांमध्ये GST समाविष्ट नाही. कंत्राटदार यांनी त्यांचा देकार सुद्धा GST वगळून (समाविष्ठ न करता) द्यावयाचा आहे. कंत्राटदार यांना GST देयकाच्या रक्कमेवर देय दराने स्वतंत्रपणे अदा करण्यात येईल.**

| निविदा काम क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रु. लक्ष | इसारा / बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कोऱ्या निविदाची नमुन्याची किंमत (ना - परतावा) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मर्ढे ते रा. म. मा. ४ लिंब बसाप्पाचीवाडी आरळे पाटखळ वाढे म्हसवे वर्ये नेले धावडशी आकले ते रा. मा. १४० रस्ता प्रजिमा १४५ कि.मी. ५/६०० ते ६/५०० (अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर हानी झालेल्या डांबरीपृष्ठभागाची दुरुस्ती करणे, बाजूपट्ट्यांची दुरुस्ती करणे, मुजलेल्या गटरची खोदाई करणे, भरावाची पुर्नस्थापना करणे इ.) ता. जि. सातारा. | ८.३६ | ९०००.०० | ६ महिने | ५९०.०० (जीएसटी सह) | वर्ग - ७ व त्यावरील नोंदणीकृत |
| २ | प्रजिमा २९ ते पोगरवाडक्ष आरे दरे रेवंडे वावदरे राजापुरी ते प्रजिमा २९ रस्ता प्रजिमा १४० कि. मी. २/२५० ते ३/४५० (अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर हानी झालेल्या डांबरीपृष्ठभागाची दुरुस्ती करणे, बाजूपट्ट्यांची दुरुस्ती करणे, मुजलेल्या गटरची खोदाई करणे, भरावाची पुर्नस्थापना करणे इ.) ता. जि. सातारा. | ८.३३ | ९०००.०० | ६ महिने | ५९०.०० (जीएसटी सह) | वर्ग - ७ व त्यावरील नोंदणीकृत |
| ३ | प्रजिमा २९ ते पोगरवाडी आरे दरे रेवंडे वावदरे राजापुरी ते प्रजिमा २९ रस्ता प्रजिमा १४० कि. मी. ४/०० ते ४/८५० (अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर हानी झालेल्या डांबरीपृष्ठभागाची दुरुस्ती करणे, बाजूपट्ट्यांची दुरुस्ती करणे, मुजलेल्या गटरची खोदाई करणे, भरावाची पुर्नस्थापना करणे इ.) ता. जि. सातारा. | ८.३८ | ९०००.०० | ६ महिने | ५९०.०० (जीएसटी सह) | वर्ग - ७ व त्यावरील नोंदणीकृत |
| ४ | रा. म. मा. ४ ते म्हसवे करंजे ते मोळाचा ओढा शाहूपूरी पोलिस ठाणे मतकर कॉलनी ते शाहूपूरी चौक ते जुना मेढा रस्ता ते सारखळ प्रजिमा ११८ कि.मी. ९/१०० ते १०/२०० (अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर हानी झालेल्या डांबरीपृष्ठभागाची दुरुस्ती करणे, बाजूपट्ट्यांची दुरुस्ती करणे, मुजलेल्या गटरची खोदाई करणे, भरावाची पुर्नस्थापना करणे इ.) ता. जि. सातारा. | ८.२७ | ९०००.०० | ६ महिने | ५९०.०० (जीएसटी सह) | वर्ग - ७ व त्यावरील नोंदणीकृत |
| ५ | प्रजिमा २९ ते ठोसेघर चिखली जांभे बापोशी करंजोशी आवर्डे ते प्रजिमा ८३ रस्ता प्रजिमा १३४ कि.मी. ५/६८० ते ७/०८० (अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर हानी झालेल्या डांबरीपृष्ठभागाची दुरुस्ती करणे, बाजूपट्ट्यांची दुरुस्ती करणे, मुजलेल्या गटरची खोदाई करणे, भरावाची पुर्नस्थापना करणे इ.) ता. जि. सातारा. | ८.२७ | ९०००.०० | ६ महिने | ५९०.०० (जीएसटी सह) | वर्ग - ७ व त्यावरील नोंदणीकृत |
| ६ | प्रजिमा २९ ते ठोसेघर चिखली जांभे बापोशी करंजोशी आवर्डे ते प्रजिमा ८३ रस्ता प्रजिमा १३४ ते प्रजिमा ८२ रस्ता प्रजिमा १३४ कि.मी. ७/३२० ते ८/२४० (अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर हानी झालेल्या डांबरीपृष्ठभागाची दुरुस्ती करणे, बाजूपट्ट्यांची दुरुस्ती करणे, मुजलेल्या गटरची खोदाई करणे, भरावाची पुर्नस्थापना करणे इ.) ता. जि. सातारा. | ८.२४ | ९०००.०० | ६ महिने | ५९०.०० (जीएसटी सह) | वर्ग - ७ व त्यावरील नोंदणीकृत |
| ७ | प्रजिमा २९ परळी बनघर कुस खुर्द कुस बु. खडगांव ताकवली निगुडमाळ नित्रळ कातवडी केळवली धनगरवाडी धावली ते प्रजिमा २६ रस्ता प्रजिमा १४४ कि.मी. २८/०५० ते २८/८९० (अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर हानी झालेल्या डांबरीपृष्ठभागाची दुरुस्ती करणे, बाजूपट्ट्यांची दुरुस्ती करणे, मुजलेल्या गटरची खोदाई करणे, भरावाची पुर्नस्थापना करणे इ.) ता. जि. सातारा. | ८.२१ | ९०००.०० | ६ महिने | ५९०.०० (जीएसटी सह) | वर्ग - ७ व त्यावरील नोंदणीकृत |
| ८ | परळी २९ परळी बनघर कुस खुर्द कुस बु. खडगांव ताकवली निगुडमाळ नित्रळ कातवडी केळवली धनगरवाडी धावली ते प्रजिमा २६ रस्ता प्रजिमा १४४ कि.मी. २९/२४० ते २९/९९५ (अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर हानी झालेल्या डांबरीपृष्ठभागाची दुरुस्ती करणे, बाजूपट्ट्यांची दुरुस्ती करणे, मुजलेल्या गटरची खोदाई करणे, भरावाची पुर्नस्थापना करणे इ.) ता. जि. सातारा. | ८.२४ | ९०००.०० | ६ महिने | ५९०.०० (जीएसटी सह) | वर्ग - ७ व त्यावरील नोंदणीकृत |
| ९ | मांडवे पाडळी नागठाणे बोरगांव अपशिंगे नांदगांव रस्ता प्रजिमा ३२ कि. मी. २१/१५० ते २२/२५० (अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर हानी झालेल्या डांबरीपृष्ठभागाची दुरुस्ती करणे, बाजूपट्ट्यांची दुरुस्ती करणे, मुजलेल्या गटरची खोदाई करणे, भरावाची पुर्नस्थापना करणे इ.) ता. जि. सातारा. | ८.२७ | ९०००.०० | ६ महिने | ५९०.०० (जीएसटी सह) | वर्ग - ७ व त्यावरील नोंदणीकृत |

टिप -
१. सदर निविदा सुचना कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयामध्ये नोटीस बोर्डावर पहावयास मिळेल.
२. वरील निविदा सुचना www.mahapwd.gov.in या वेबसाईटवर पहावयास मिळेल.

जा.क्र.लेखा/जी-११७/१९३१/२०२५
कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग,
सातारा यांचे कार्यालय.
(दि.०७/०३/२०२५)
**जिमाका/सातारा/जा/४६३/२०२४-२०२५**

**कार्यकारी अभियंता**
सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा